प्रेस नोट दिनांक :- ०४/०९/२०२३

**महाराष्ट्र राज्य विद्युत विज वितरण कंपनीचे कल्याण येथील भरारी पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन ७०,०००/-रू लाच स्विकारताना ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४७५/२०२३, अंबरनाथ पोलीस स्टेशन, ठाणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) हेमंत गोविंद तिडके, सहाय्यक अभियंता,(वर्ग-२), भरारी पथक नं.१, कल्याण<br>२) पांडुरंग देवदास सुर्यवंशी, प्रधान तंत्रज्ञ (वर्ग-३), उल्हासनगर उप विभाग-२,<br>३) सागर जनार्दन ठाकूर,कनिष्ठ लिपीक (वर्ग-३),म.रा.वि.वि.कं.अंबरनाथ उप विभाग,<br>४) नितीन शाम साळवे, (खाजगी इसम) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १) आरोपी क्रमांक १ यांनी ७५,०००/- रू. लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती ७०,०००/- रु. लाचेची मागणी केली.<br>२) आरोपी क्रमांक २ यांनी आरोपी क्र. १ यांचेकरिता ७५,०००/- रू.<br>३) आरोपी क्रमांक ३ यांनी आरोपी क्र. १ यांचेकरिता ७०,०००/- रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | आरोपी क्रमांक २ यांनी आरोपी क्र. १ यांचेकरिता ७०,०००/- रुपये स्विकारुन सदर रक्कम आरोपी क्र. ४ खाजगी इसमाकडे दिली. |
| थोडक्यात हकिकत | दिनांक १४/०८/२०२३ रोजी आरोपी क्र.१ यांनी भरारी पथकाद्वारे तक्रारदार हे राहत असलेल्या घराचे लाईट मिटर ताब्यात घेवून दि. २८/०८/२०२३ रोजी तपासणी करुन, त्यामध्ये छेडछाड झाली असून, गेल्या ३ वर्षाचे लाईट बिल दंडासह ३ ते ४ लाख रुपये भरावे लागतील असे सांगितले. परंतू एवढी रक्कम भरायची नसेल तर फक्त १ लाख रुपये पर्यंत बिल पाठवतो असे सांगून, वरिल आरोपी क्र. १ यांनी स्वत:करिता ७५,०००/- रु. लाचेच्या रकमेची मागणी केली असलेबाबत. दि. ३१/०८/२०२३ रोजी लेखी तक्रार दिली होती.<br>त्या अनुषंगाने नमूद दिवशी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये १) लोकसेवक हेमंत तिडके, २) लोकसेवक पांडुरंग सुर्यवंशी, ३) लोकसेवक सागर ठाकूर यांनी तक्रारदार यांचे लाईट बिलाची वाढीव रक्कम न देणेकरिता ७५,०००/- रु. लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती ७०,०००/-रु. लाचेची मागणी करुन, ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले.<br>सदर पडताळणीचे अनुषंगाने दि.०४/०९/२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र.२) पांडुरंग सुर्यवंशी, प्रधान तंत्रज्ञ, उल्हासनगर उप विभाग-२, यांनी तक्रारादार सिंग यांचेकडुन ७०,०००/- रू. स्विकारुन, सदर लाचेची रक्कम आरोपी क्र. ४) नितीन साळवे, खाजगी इसम यांचेकडे दिली असताना, नमूद आरोपी क्र. २ ते ४ यांना ११:३३ वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच आलोसे क्र. १ हेमंत गोविंद तिडके, सहा.अभियंता, भरारी पथक क्र.१, कल्याण, म.रा.वि. वि.कंपनी यांना ११:४० वा. ताब्यात घेण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी :- मा. श्री. सुनिल लोखंडे सो.,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि,ठाणे परिक्षेत्र,ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता** :- ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१.
**संकेतस्थळ** :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
**ई-मेल** :- spacbthane@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार**
**ॲप्लीकेशन** :- acbmaharashtra.net
**टोल फ्री नंबर** :- १०६४.
**दुरध्वनी क्रमांक** :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९.
**व्हॉटस्‌ ॲप क्रमांक** :- ९९३०९९७७००.

पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

**(हणमंत क्षिरसागर)**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**